


दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे

वर्ष ४ । अंक ९५ । गुरुवार २ जानेवारी २०२५ । पाने ४ । मूल्य ₹ २

https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322






विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांचा सर्व पक्षीय सत्कारसाठी सर्व पक्षीय पदाधिकारी यांचे वतीने पत्रकार परिषद घेण्यात आली. (छाया - राजू खरपुडे, नगर)

## आयुक्त साहेब हेच का फ्लेक्समुक्त शहराचं धोरण? - किरण काळे

### संभाजी महाराजांच्या पुतळ्याचे ठिकाण फ्लेक्स मुक्त करा; पुतळा व नाट्यगृहाचे काम तात्काळ पूर्ण करा




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** नुकतेच मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी शहर फ्लेक्समुक्त करणार असल्याचं धोरण जाहीर केलं. अनधिकृत फ्लेक्सवर कारवाई केली जाईल असे सांगितलं. मात्र काही तास उलटले नाही तोच काँग्रेसने मनपाच्या गलथान कारभारावर सवाल उपस्थित केला आहे. प्रोफेसर कॉलनी चौकामध्ये लावण्यात आलेल्या राजकीय अनधिकृत फ्लेक्स वरून हेच का मनपा आयुक्तांचं फ्लेक्समुक्त शहराचं धोरण ?, असा जाहीर सवाल करत शहर काँग्रेस जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी निशाणा साधला आहे.

काळे म्हणाले की, शहराचं बॅनरबाजीमुळे विद्रूपीकरण होत आहे. हे थांबवत शहर स्वच्छ केल पाहिजे. मनपान जाहीर केलेल्या धोरणाच आम्ही काँग्रेसकडून निश्चितपणे स्वागत करतो. मात्र मनपाच धोरण हे सर्वांसाठी समान नसून सत्ताधारी राजकीय पक्षांना यातून सूट देण्यात आली आहे. म्हणूनच इतर राजकीय पक्ष तसेच व्यावसायिक जाहिरातींचे फलक मनपाने काढले खरे. मात्र काहींना यातून मनपाने सूट दिली आहे.

काळे पुढे म्हणाले की, आयुक्तांनी सांगितलं होतं की इथून पुढे शहरात फ्लेक्स लावण्यापूर्वी मनपाची पूर्वपरवानगी घ्यावी लागेल. परवानगीचा क्रमांक संबंधित फ्लेक्सवर छापावा लागेल. तो न छापता फ्लेक्स लावला गेल्यास फ्लेक्स छपाई करणाऱ्या प्रिंटर्सवर देखील गुन्हा दाखल केला जाईल. ज्यांचे फ्लेक्सवर फोटो, नावे आहेत त्यांच्यावर देखील गुन्हे दाखल केले जातील. आता मनपा या राजकीय फ्लेक्स बाजी करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची धमक दाखवणार काय ?, असा जाहीर सवाल किरण काळे यांनी आयुक्त डांगे यांना केला आहे. ■ पान ४ वर

## ब्राह्मणीत दूध डेअरीचे सतरा लाख लुटणाऱ्या टोळीतील तिघेजण जेरबंद

### एलसीबीची कारवाई । अटक आरोपींमध्ये दूध डेअरीत काम करणारा अल्पवयीन मुलगा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** राहुरी तालुक्यातील ब्राह्मणी येथील दूध डेअरीची १७ लाख रक्कम लुटणा-या टोळीतल तिघांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने जेरबंद केले आहे. त्यात दूध डेअरीत काम करणा-या एका अल्पवयीन मुलाचा समावेश आहे.

प्रस्तुत बातमीची हकिगत अशी की, फिर्यादी अनिल मुरलीधर बनसोडे (वय ५१, रा.ब्राम्हणी, ता. राहुरी) हे दिनांक ३० डिसेंबर रोजी मुळा अॅग्रो प्रोडक्ट लि. ब्राम्हणी या कंपनीची १७ लाख रूपये रोख रक्कम बॅकेमध्ये भरणा करण्यासाठी सहका-यांसह कारमधून जात असताना अज्ञात चारजणांनी काळ्या रंगाची कार आडवी लावली व दोघांनी गज व टॉमीने फिर्यादीच्या कारच्या काचा फोडून टॉमीने मारहाण करून सतरा लाख रुपये असलेली बॅग बळजबरीने घेऊन गेले. याबाबत राहुरी पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ३०९ (६) प्रमाणे जबरी चोरीचा गुन्हा दाखल झालेला आहे.

एलसीबीने या गुन्ह्याचा समांतर करताना सीसीटीव्ही व तांत्रिक विश्लेषणाच्या आधाराने फिर्यादीच्या मुळा अॅग्रो प्रोडक्ट लि. ब्राम्हणी या डेअरीमध्ये काम करणारा विधीसंघर्षीत बालक याचा गुन्हयामध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यास ताब्यात घेऊन विचारपूस करता त्याने मुळा अॅग्रो प्रोडक्ट डेअरीमधील रोख रक्कम बँकेमध्ये कधी भरण्यासाठी जाते याबाबतची माहिती त्याचा मावसभाऊ अमोल शिंदे यास दिली होती. त्यानुसार अमोल शिंदे याने त्याचे साथीदार सचिन वायदंडे, शुभम गुळसकर, अभिषेक जाधव, पप्पू कुसळकर, मोहन लष्करे यांच्यासह लुटीचा कट रचून मोहन लष्करे हा किया कंपनीची कार घेऊन आला. तसेच एका मोटारसायकलवर फिर्यादीच्या कारवर पाळत ठेवून डेअरीमधून निघाल्यापासूनची संपूर्ण ■ पान ४ वर

**पथकात यांचा सहभाग**

**सदरची कारवाई पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर, तसेच तपास पथकातील सपोनि हेमंत थोरात, पोसई तुषार धाकराव व पोलीस अंमलदार मनोज गोसावी, गणेश भिंगारदे, ज्ञानेश्वर शिंदे, संदीप दरंदले, संदीप पवार, सोमनाथ झांबरे, बाळासाहेब खेडकर, रणजित जाधव, प्रमोद जाधव, अमृत आढाव, विशाल तनपुरे, किशोर शिरसाठ, रमिझ आतार, फुरकान शेख, प्रशांत राठोड, मेघराज कोल्हे, महादेव भांड, अरुण मोरे यांच्या दोन स्वतंत्र पथकांनी केली.**

## मनू भाकेर, डी गुकेशसह चार खेळाडूंना खेलरत्न

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था** केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने आज राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२४ ची घोषणा केली आहे. यामध्ये २०२४ च्या ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकणारी नेमबाज मनू भाकेर, जागतिक बुद्धिबळ चॅम्पियन डी गुकेश, हॉकीपटू हरमनप्रीत सिंग आणि पॅरा अॅथलीट प्रवीण कुमार या चार क्रीडापटूंना मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे.

दिनांक १७ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता राष्ट्रपती भवन येथे आयोजित कार्यक्रमात पुरस्कार विजेत्यांना ■ पान ४ वर

**अशी आहे चौघांची कामगिरी**

**अवघ्या २२ वर्षांच्या मनू भाकेरने ऑगस्टमध्ये झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत १० मीटर एअर पिस्तूल वैयक्तिक आणि १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक स्पर्धेत दोन कांस्य पदके जिंकली होती. यासह मनू एकाच ऑलिम्पिक स्पर्धेत दोन पदके जिंकणारी स्वतंत्र भारताची पहिली ऍथलीट बनली आहे. याच ऑलिम्पिक स्पर्धेत हमरनप्रीत सिंगने त्याच्या नेतृत्त्वाखाली भारतीय हॉकी संघाला सलग दुसरे कांस्यपदक मिळवून दिले होते. दुसरीकडे, नुकत्याच झालेल्या जागतिक बुद्धीबळ अजिंक्यपद स्पर्धेचे १८ वर्षांच्या डी गुकेशने जेतेपद पटकावले होते. ही स्पर्धा जिंकणारा तो आतापर्यंतचा सर्वात तरुण बुद्धीबळपटू आहे. याबरोबर त्याने गेल्या वर्षी बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारतीय संघाला ऐतिहासिक सुवर्ण पदक जिंकण्यात मदत केली होती. खेलरत्न पुरस्कार जिंकणाऱ्या खेळाडूंमध्ये चौथे नाव पॅरा अथलीट प्रवीण कुमार याचे आहे. प्रवीण कुमारने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये उच्च उडी या खेळ प्रकारात भारताचे प्रतिनिधीत्व केले होते. त्याला पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये टी ६४ चॅम्पियन म्हणून गौरविण्यात आले होते. ज्या खेळाडूंना गुडघ्याच्या खाली एक किंवा दोन्ही पाय नसतात ते टी ६४ प्रकारच्या खेळात सहभागी होत असतात.**

## पीओपी गणेश मूर्ती वरील बंदी कायमस्वरूपी रद्द करून न्याय मिळवून द्यावा

### गणेश मूर्तिकार संघटनेचे आ. जगताप यांना साकडे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** अहिल्यानगर महानगरपालिकेने दि. १६ मे २०२४ रोजी गणेश मूर्ती करांना दिलेल्या सूचना पत्रास अनुसरून आम्ही मूर्ती कारखानदारांनी महानगरपालिकेस दि. २९ मे २०२४ च्या निवेदन पत्रामध्ये पी.ओ.पी हा खनिज पदार्थ असुन यात कोणत्याही प्रकारचे कैमिकल नसल्या कारणे प्रदूषण करत नसल्याबाबत पुरावे सादर केलेली आहे. त्याबाबत १६० पानी कागदोपत्री पुरावे व शास्त्रज्ञांच्या डोळस पर्यावरण या पुस्तकासह सर्व पुरावे अहिल्यानगर म.न.पा. सादर केलेली आहेत.

तसेच मा. मंत्री श्री. दिपक केसरकर साहेब यांनी विधान परिषदेमध्ये दि.२७/०७/२०२३ रोजी पी.ओ.पी संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले होते की पी.ओ.पी मूर्तीचे उत्पादन आणि विक्रीवर कोणत्याही प्रकारची बंदी नाही. याबाबतची व्हिडिओ क्लिप सुद्धा पुराव्यासह दाखल केलेली आहे.


पीओपी वरील निर्णय रद्द करून गणेश गणेशमूर्तीकारांना न्याय मिळवून द्यावा असे आशयाचे निवेदन अहमदनगर गणेश मूर्तिकार संघटनेच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांना देण्यात आले यावेळी. जिल्हाध्यक्ष भरत निंबाळकर वसंत लोढा ,संतोष रायपेल्ली, संजय देवगुनी, संदीप सुसरे, नितीन राजापुरे, चंद्रकांत जोरवेकर( संगमनेर) राजू दळवी (राहता ) विकास गोरे (राहुरी ) तानाजी वाघमोडे (नेवासा) संजय पारखे (पाथर्डी) खंडू चंदन (श्रीगोंदा) आधी सह जिल्हाभरातून २०० मूर्ति कारखानदार उपस्थित होते.

महाराष्ट्रासह देशभर गणेश उत्सव, नवरात्र उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होत असतात. या उत्सवामध्ये मुख्य आकर्षण हे गणेश मुर्त्या, देवीच्या मुर्त्या या असतात. व या उत्सव काळानंतर अशा मुर्त्या नदीपात्रात विसर्जित केल्या जात असत. त्या कारणे विविध पर्यावरणवादी संघटना, समाजसेवक यांनी मा. न्यायालयाकडे दाद मागून विसर्जित केल्या जाणाऱ्या मुर्त्यांची भग्नता थांबवून त्या शास्त्रशुद्ध पद्धतीने विसर्जित करून त्याचे विल्हेवाट लावण्याबाबतचे आदेश कोर्टाकडून मिळवली आहेत. ■ पान ४ वर

## नाट्य कलाकारांचे हक्काचे व्यासपीठ लवकरच नगरकरांच्या सेवेत सुरु होणार - आ. संग्राम जगताप

### प्रोफेसर कॉलनी चौक येथील मनपाच्या नाट्यसंकुल कामाची आमदार संग्राम जगताप यांनी केली पाहणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर-** मनपाच्या माध्यमातून नगरकरांच्या हक्काचे नाट्यसंकुल शहरात असावे यासाठी महापौर असताना काही प्रमाणात शासनाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला आणि कामाला देखील सुरुवात झाली मात्र या कामामध्ये काही ना काही अडचणी निर्माण होत गेल्या त्यावर मात करीत शासनाच्या माध्यमातून पुन्हा एकदा सुमारे ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला त्यानंतर नाट्य संकुलनाचे सिव्हिल वर्कचे काम अंतिम टप्प्यात आले, मात्र ठेकेदार कंपनीच्या काही अडचणीमुळे काम केले जात नसल्यामुळे महापालिका प्रशासनाने ठेकेदार बदलला असून उर्वरित काम येत्या चार महिन्यात पूर्ण होईल आणि नाट्य कलाकारांचे हक्काचे व्यासपीठ लवकरच नगरकरांच्या सेवेत सुरु होणार आहे असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

प्रोफेसर कॉलनी चौक येथील मनपाच्या नाट्यसंकुल कामाची आमदार संग्राम जगताप यांनी पाहणी केली, यावेळी आयुक्त यशवंत डांगे, माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक धनंजय जाधव, निखिल वारे, संजय चोपडा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष अभिजीत खोसे, शहर अभियंता मनोज पारखे, आर्किटेक मनोज जाधव, अजय दगडे, मुकुल गंधे, नाट्य कलाकार अ.भा.मराठी नाट्य परिषद अध्यक्ष अमोल खोले, उपाध्यक्ष शशिकांत नजान, ज्येष्ठ रंगकर्मी पी.डी.कुलकर्णी, श्रेणिक शिंगवी, स्वप्नील मुनोत, प्रसाद बेडेकर,अनंत रिसे,गायक पावन नाईक,अनंत द्रविड, आदी उपस्थित होते

अहिल्यानगर शहराला नाट्य चळवळीचा मोठा वारसा लाभलेला असून आपले नाट्य कलाकार राज्यात कला सादर करून नावलौकिक वाढवत आहे त्यांना हक्काचे व्यासपीठ निर्माण व्हावे यासाठी आम्ही प्रयत्न केले आणि अनेक वर्षाची त्यांची मागणी पूर्ण केली आणि नाट्यसंकुलचे स्वप्न लवकरच पूर्ण होईल असे मत आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केले.

१४ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या नाट्य संकुलन उभे राहावे यासाठी नाट्य कलाकार महापालिकेवर मोर्चे,आंदोलने केली, हक्काचे व्यासपीठ असावे यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली आणि आमच्या लढ्याला यश आले लवकरच नाट्य संकुलनाचे काम ■ पान ४ वर

## निवडक

### शेतकरी शरद पवार यांचे वडिलांसमवेत आमरण उपोषण सुरू




अहिल्यानगर- राळेगण म्हसोबा शिवारातील गट नंबर ९७१, ९७७ मधील उभ्या पिकामध्ये मे.अहमदनगर न्यायालयाचे रे. मु. नं. ३९९/२०१९ मधील मनाई आदेशाचा भंग करून आरोपींनी रात्रीचे वेळी,दिवसा ट्रॅक्टर घालून तुर,मुग,ज्वारी या पिकांची ४ वेळा नुकसान केले आहे.त्याबद्दल नगर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीसांनी आरोपींचे विरुध्द गुन्हा नोंदविण्यास टाळाटाळ केली तसेच घटना स्पॉटचा पंचनामा करण्यास टाळाटाळ केली. आरोपींनी केलेले गंभीर गुन्हयाची चौकशी केली नाही.तात्काळ आरोपींनी केलेले गुन्हयाची चौकशी करावी.व पिकांचे नुकसान करणाऱ्या आरोपींवर नगर तालुका पोलीस स्टेशन येथे तात्काळ गुन्हा दाखल करावा. या मागणीसाठी राळेगण म्हसोबा येथील शेतकरी शरद पवार व केसु पवार यांचे आमरण उपोषण सुरू केले आहे.

### स्मार्ट विद्युत मीटरला आम आदमी पार्टीचा विरोध कायम



अहिल्यानगर- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (एमएसईडीसीएल) द्वारे संपूर्ण महाराष्ट्रात स्मार्ट विद्युत मीटर लावण्यास करण्यात आलेल्या सक्तीला आम आदमी पार्टीच्या वतीने कायमचा विरोध दर्शविण्यात आला आहे. सदरचा निर्णय रद्द करण्याच्या मागणीचे निवेदन आपच्या वतीने जिल्हाधिकारी व विद्युत महावितरणचे अधीक्षक अभियंता रमेश पवार यांना देण्यात आले.याप्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष भरत खाकाळ, महिला आघाडीच्या अध्यक्षा ॲड. विद्या शिंदे, उपाध्यक्ष अंबादास जाधव, महासचिव दिलीप घुले, व्यापारी आघाडीचे अध्यक्ष राजेंद्र सामल, मीडिया सहसंयोजक गौतम कुलकर्णी, युवा आघाडी उपाध्यक्ष विजय लोंढे, ऑफिस इन्चार्ज नामदेव ढाकणे आदी पदाधिकारी उपस्थित होते.स्मार्ट विद्युत मीटरची करण्यात आलेली सक्ती राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या आर्थिक शोषण करण्याचा घाट शासनाने घातला असल्याचा आरोप आपचे शहर जिल्हाध्यक्ष भरत खाकाळ यांनी केला आहे. खाकाळ म्हणाले की, स्मार्ट विद्युत मीटरची निर्मिती व जोडण्याची किंमत ६ हजार रुपये प्रति मीटर अपेक्षित आहे. मात्र या मीटरचा किमतीत दुप्पट वाढ करून १२ हजार रुपये प्रति मीटर दराने नागरिकांकडून वसुल करण्यासाठीचा कंत्राट खाजगी कंपन्यांना देण्यात आला आहे. भांडवलवादी कंपन्यांना फायदा व्हावा, या हेतूने शासनाने ही योजना आखली आहे. ग्राहकांना प्रीपेड स्वरूपात विद्युत बिलाचे पैसे भरून ठेवण्यास भाग पाडून, महाराष्ट्राच्या जनतेचा आर्थिक शोषण करू पाहणाऱ्या बोगस विद्युत स्मार्ट मीटर योजनेचा आम आदमी पार्टीचा कायम विरोध राहणार असल्याचे त्यांनी म्हंटले आहे. खाकाळ यांनी विद्युत महावितरणचे अधीक्षक अभियंता यांना शहरात जनतेला पूर्ण माहिती न देता स्मार्ट मीटर बसविण्यात येत आहे. सध्या दिल्लीगेट, तेलीखुंट या परिसरात काही ठिकाणी लावले आहेत आणि संपूर्ण शहरात लावणार आहे या पुढे विद्युत स्मार्ट मीटर हे शहरात लावू नये, यावर अधीक्षक अभियंता यांनी ते ऐच्छिक स्वरूपाचे असल्याचे स्पष्ट करुन सांगितले. जर ते ऐच्छिक आहे आणि पूर्ण माहिती न देता लावले जात आहे, तर पुढे जाऊन गोरगरीब जनतेचे आर्थिक शोषण झाले तर याला जबाबदार कोण? असल्याचा प्रश्न उपस्थित केला. तर याबाबत खाकाळ यांनी मागितल्यावर अधीक्षक अभियंता यानी वरिष्ठ पातळीवर कळविण्याचे उत्तर दिले. ॲड. विद्या शिंदे यांनी लोकसभा आणि विधान सभेच्या आगोदर स्मार्ट मीटर लावले जाणार नसल्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र निवडणूक संपताच हे मीटर लावून जनतेची लूट करण्याचा विद्युत महावितरणचा डाव असल्याचा आरोप केला. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने शहरात स्मार्ट विद्युत मीटर बसविण्याचे थांबवले नाही, तर जनआंदोलन उभे करणार असल्याचा इशारा आम आदमी पार्टीच्या वतीने देण्यात आला आहे.

# डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या परिचर्या महाविद्यालयात तृतीय आंतरराष्ट्रीय परिषद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर –** आरोग्य क्षेत्रात होणाऱ्या जलद गती बदलामुळे परिचारिका क्षेत्रामध्ये सार्वभौम, सशक्त व मजबूत नेतृत्वाची गरज भासत आहे. परिचर्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या नेतृत्वांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात येणाऱ्या आव्हानांवर नेहमी मात करावी लागते. आरोग्य क्षेत्रात होणाऱ्या बदलांचा परिणाम हा परिचर्या क्षेत्राच्या नेतृत्वामध्ये बदल घडून आणण्यास कारणीभूत आहेत. आरोग्य सेवा प्रणालीवरील ताण आणि आरोग्यासंदर्भातील जागतिक समस्यांना सामोरे जाण्यासाठी परिचारिका क्षेत्रामध्ये सार्वभौम सक्षम असे नेतृत्व तयार होणे गरजेचे आहे, ज्यामुळे परिचर्या क्षेत्राचे भविष्य हे उज्वल होऊ शकेल. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या परिचार्या महाविद्यालयाने २० वर्षा चा कार्यकाल यशस्वीरित्या पूर्ण केला असून यानिमित्ताने महाविद्यालयात ''सक्षम सार्वभौम नेतृत्व तयार करून परिचर्या क्षेत्राचे भविष्य उज्ज्वल करणे'' या विषयावर दिनांक २८ डिसेंबर२०२४ रोजी तृतीय आंतरराष्ट्रीय परिषद पार पडली.

परिषदेची सुरुवात माझी पंतप्रधान स्वर्गीय डॉ.मनमोहन सिंग, यांना श्रद्धांजली देऊन करण्यात आली. परिषदेच्या प्रमुख पाहुण्या म्हणून माननीय डॉ . एम . प्रकासम्मा , या होत्या. सदार परिषदेसाठी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा माननीय सौ. शालिनीताई विखे पाटील आणि डॉ.नीलिमा सोनवणे, अतिरिक्त नर्सिंग संचालक, आरोग्य आयुक्तालय, मुंबई कार्यक्रमाला सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होत्या. मा . वसंतराव कापरे, विश्वस्थ डॉ . विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन , डॉ. पी. एम. गायकवाड , संस्थेचे प्रभारी सेक्रेटरी,



प्रा. डॉ. अभिजीत दिवटे,संचालक (वैद्यकीय), डॉ. रामचंद्र पडळकर मुख्य प्रशासकीय अधिकारी या परिषदेकरिता उपस्थित होते.

नेतृत्व हे केवळ ज्ञान आणि कौशल्यांपुरते मर्यादित नाही, तर ते नैतिकता, करुणा आणि सहकार्य या मूल्यांवर आधारित असले पाहिजे असे मत जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ शालिनीताई विखे पाटील यांनी मांडले.या संमेलनाद्वारे आपण नर्सिंग क्षेत्राच्या नेतृत्वाला नवी दिशा देणार आहोत. मला विश्वास आहे की, आपल्या विचारांची देवाणघेवाण, सार्थक संवाद , सर्वांचे सक्रिय योगदान यातून एक स्थिर आणि सर्वसमावेशक नेतृत्व विकसित होईल असा विश्वास माननीय डॉ. एम. प्रकासम्मा यांनी व्यक्त केला.

डॉ. जॉय पायपर, सहाय्यक प्राध्यापक ग्राउंड कॉलेज, संयुक्त राज्य अमेरिका (यु.एस.ए.) यांनी परिचर्या क्षेत्रामध्ये परिपूर्ण क्षमतेचे नेतृत्व तयार करून परिचारिका सेवेचा दर्जा उंचावणे' या विषयावर आपले मत मांडले. 'भविष्यातील नेतृत्व : परिचर्या क्षेत्रातील नेतृत्वाचे सक्षमीकरण ' या विषयावर बोलताना ,डॉ. सुवरेश नरुला खन्ना, प्राध्यापक व संस्थापक इमिरियट्स पेट्रोन, न्यूयॉर्क (अमेरिका) म्हणाल्या, आपल्याला असे नेतृत्व विकसित करावे लागेल जे नैसर्गिक असून आपल्या प्रयत्नांतून आणि दृष्टिकोनातून निर्माण होईल.

'अनुकरणीय सार्वभौम नेतृत्व तयार करून परिचर्या क्षेत्रात नेतृत्व उंचावणे' यावर बोलताना विविध आव्हाने आणि संकटांना सामोरे जाताना आपल्याला उद्दिष्टे साध्य करण्याची क्षमता ,मानसिक दृढता ,संवेदनशीलता या गुणांची आवश्यकता असते असे डॉ. नानसी डायस, सहाय्यक प्राध्यापक, पश्चिम कॅरोलीना विद्यापीठ यांनी आपले मत व्यक्त केले. तसेच मुंबई येथील हिंदुजा हॉस्पिटल हॉस्पिटल च्या संचालक डॉ.फलाक्षी मांजरेकर यांनी 'सशक्त नेतृत्व तयार करणे 'परिचारिका क्षेत्रात नेतृत्वाचे भविष्य: आव्हान आणि संधी' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये डॉ.शोभा गायकवाड, सहाय्यक प्राध्यापक एसएनडीटी परिचर्या महाविद्यालय, महिला विद्यापीठ मुंबई यात सहभागी होत आहेत. तसेच या चर्चासत्रामध्ये सौ.ग्रेसी मथाई, सीओ बेबी मेमोरिअल हॉस्पिटल कालिकत,केरळ ,डॉ.नीलिमा सोनवणे, अतिरिक्त नर्सिंग संचालक, आरोग्य आयुक्तालय, मुंबई, महाराष्ट्र, डॉ.अजिता नायर,मॅनेजिंग डायरेक्टर हेल्थ बीज हेल्थकेअर मॅनेजमेंट.सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड आणि डॉ. पर्ल क्रूज,लीड हेमेटॉलॉजी रिसर्च. क्वीन एलिझाबेथ हॉस्पिटल ,आयएनएच इंग्लंड ,यांनी सभाग घेतला आणि आपले मत व्यक्त केले.

या परिषदेचा ७४६ शिक्षक, परिचारिका व विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये कतार, यू. एस., यू. के.,राजस्थान, गुजरात इ. ठिकाणाहून अनेक सदस्यांची सहभाग घेतला व ६२ विद्यार्थी व शिक्षकांनी आपले शोध निबंध सादर केले. सर्वात्कृष्ट शोध निबंध सादर करणाऱ्या विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. आंतरराष्ट्रीय परिषद यशस्वी करण्यासाठी फाउंडेशनचे प्रा. डॉ. अभिजीत दिवटे,संचालक (वैद्यकीय) यांचे मार्गदर्शन लाभले .संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ.रामचंद्र पडोळकर आणि प्रा. डॉ. प्रतिभा चांदेकर, प्राचार्या, परिचार्या महाविद्यालय यांच्या नेतृत्वाखाली या परिषदेचे आयोजन करण्यात आले . भारतीय परिचर्या परिषदेकडून १ तर महाराष्ट्र परिचर्या परिषदेकडून २ क्रेडिट पॉईट देण्यात आले. महाराष्ट्र परिचर्या परिषदेकडून श्री. पंकज काळे यांनी निरीक्षक म्हणून काम पाहीले तसेच श्रीमती. आग्नेस अरुण स्वामी , यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक, या विद्यापीठाकडून निरीक्षक म्हणून काम पाहीले. या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये परिचर्या क्षेत्रातील नामवंत व्यक्तिमत्वांनी आपली मते मांडली. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील यांनी यशस्वीरित्या परिषदेच्या आयोजनाबद्दल कौतुक केले . प्रा. अमोल टेमकर , परिषदेचे आयोजक , यांनी आभार प्रदर्शन केले .या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी परिचर्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## शनिवारपासून महानगरपालिकेचे स्वच्छता अभियान सुरू

**दर शनिवारी अधिकारी, कर्मचारी राबवणार अभियान**
**नागरीक, सामाजिक संघटनांना सहभागी होण्याचे आवाहन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर –** महानगरपालिकेचे शहर स्वच्छता अभियान येत्या शनिवारपासून सुरू होत आहे. दर शनिवारी शहराच्या एकेका भागात अधिकारी, कर्मचारी सहभागी होणार आहेत. शहरातील नागरिक, सामाजिक संघटनांनी या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे. नव्या वर्षात शहर स्वच्छतेसाठी महानगरपालिकेने संकल्प केला आहे.

अहिल्यानगर शहर स्वच्छ शहर म्हणून ओळखले जावे, यासाठी नागरीक, सामाजिक संघटनांच्या सहकार्यातून, सहभागातून हे अभियान हाती घेण्यात आले आहे. प्रत्येक शनिवारी शहर व उपनगराच्या एकेका भागात हे अभियान राबविण्यात येणार आहे. येत्या शनिवारी ४ जानेवारी रोजी स्टेट बँक चौक ते चांदणी चौक दरम्यान स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. या भागात अतिक्रमण हटाव मोहीम राबवण्यात आली होती. यात या रस्त्यालगत असलेली अतिक्रमणे हटविली होती. त्यामुळे या भागात स्वच्छता अभियान राबवून परिसर स्वच्छ करण्यात येणार आहे. नागरीक, सामाजिक संघटनेने या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

## मर्चंटस बँक आयोजित एएमसी कप २०२४ क्रिकेट स्पर्धेत पुरुषांमध्ये रिकव्हरी चॅलेंजर्स तर महिलांमध्ये टिडीएस वुमेन्सला विजेतेपद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर –** अहमदनगर मर्चंटस को ऑप बँकेच्या वतीने कर्मचाऱ्यांसाठी आयोजित एएमसी कप २०२४ क्रिकेट स्पर्धेत पुरुषांमध्ये रिकव्हरी चॅलेंजर्स तर महिलांमध्ये टिडीएस वुमेन्स ला विजेतेपद मिळाले. वुमन ऑफ दि सिरीज पुरस्कार कोमल गांधी तर मॅन ऑफ दि सिरीज पुरस्कार अनिकेत शिंदे यांनी मिळवला. शानदार समारंभात स्पर्धेचे बक्षीस वितरण कार्यक्रम झाला.

बुरूडगाव रोड वरील साईनगर टर्फ क्लबवर स्पर्धेचे उद्घाटन बँकेचे संस्थापक चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांच्या हस्ते आकाशात फुगे सोडून करण्यात आले. याप्रसंगी बँकेचे व्हा. चेअरमन अमित मुथा,बँकेचे संचालक संजय बोरा, किशोर मुनोत, संजय चोपडा, विजय कोथिंबीरे, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य राजेश झंवर, पेमराज बोथरा, कर्मचारी संचालक प्रसाद गांधी, जॉईट सीईओ नितीन भंडारी व सर्व कर्मचारी उपस्थित होते.




चेअरमन हस्तीमलजी मुनोत म्हणाले, दररोज चे काम अधिक कार्यक्षमतेने करण्यासाठी शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम असणे गरजेचे असते. त्यासाठी मैदानी खेळ, नियमित व्यायाम महत्त्वाचा आहे. मर्चंट बँकेने क्रिकेट स्पर्धा आयोजित करताना सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना सहभागी करून घेत त्यांना खेळाचा निखळ आनंद मिळवून दिला आहे. कर्मचारी आनंदी, सकारात्मक असतील तर बँकेचे कामकाज अधिक प्रभावीपणे करू शकतील. सतत कार्यक्षम आणि आनंदी राहण्यासाठी प्रत्येकाने खेळ आणि व्यायामाला दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावे असे आवाहन त्यांनी केले.

व्हाईस चेअरमन अमित मुथा यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, कोणत्याही मोठ्या संस्थेत एकीचे बळ महत्त्वाचे असते. या स्पर्धेनिमित्त अधिकारी, कर्मचारी आपापल्या संघातून एकत्र खेळत आहेत. यातून संघभावना, खिलाडूवृत्ती तयार होण्यास मदत होते. बँकेत काम करतानाही अशीच सांघिक भावना ठेवून प्रत्येकाने एकमेकांना सहकार्य करून स्वतःची आणि बँकेची प्रगती साधली पाहिजे. चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांच्या प्रोत्साहनातून आयोजित ही स्पर्धा सर्वांचाच उत्साह वाढवणारी आहे.

## शेवगाव पंचायत समितीमधील समाज कल्याण विभाग हा निधी वितरणबाबत उदसीन – चांद शेख

**अन्यथा १६ जानेवारी रोजी पंचायत समिती शेवगाव कार्यालयासमोर सावली दिव्यांग संघटना करणार ठिय्या आंदोलन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव –** १५ जानेवारी २०२५ पर्यंत जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्याकडून राबवण्यात येणाऱ्या विविध योजनेतील मंजूर लाभार्थी यांना शासनाच्या नियमानुसार मंजुरी पत्राद्वारे कळवण्यात यावे या मागणीचे लेखी निवेदन सावली दिव्यांग संघटनेचे शेवगाव तालुका अध्यक्ष यांनी शेवगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अजितकुमार बांगर यांना दिले आहे. सदर दिलेल्या निवेदनात नमूद केलेले आहे की, जिल्हा परिषद अहिल्यानगर सेस फ़ंडमधील निधी विविध कल्याणकारी योजनेवर खर्च केला जातो तशी तरतूद देखील आहे. जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडून विविध योजनेतील पात्र लाभार्थी यांचा निधी पंचायत समिती शेवगाव यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत समाज कल्याण विभागाकडून दिव्यांग निधी, मागासवर्गीय निधी तसेच महिला बालकल्याण विभाग यांचेकडून योजना राबविण्यात येते. पंचायत समिती शेवगाव येथील समाज कल्याण विभागाच्या गलथान कारभारामूळे आज आखेर पर्यंत कोणत्याही मंजूर झालेल्या लाभार्थी यांना लेखी अथवा तोंडी कळवण्यात आलेले नाही. याबाबत सावली दिव्यांग संघटनेकडून सततचा पाठपुरावा केला जात आहे. समाज कल्याण विभाग पंचायत समिती शेवगाव यांचेकडून मंजूर पात्र लाभार्थी यांना कळविण्यात येत नाही. त्यामुळे मंजूर लाभार्थी यांना पुढील प्रोसेस करता येत नसल्याने मंजूर लाभार्थी हे निधीपासून वंचित आहे. गटविकास अधिकारी यांनी देखील या बाबत लक्ष देणेबाबत गरजेचे आहे.

समाज कल्याण विभाग पंचायत समिती शेवगाव यांचेकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जात नाही. त्यामुळे १५ जानेवारी २०२५ पर्यंत जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्याकडून राबवण्यात येणाऱ्या विविध योजनेतील मंजूर लाभार्थी यांना शासनाच्या नियमानुसार मंजुरी पत्राद्वारे कळवीण्यात यावे असे दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. यावेळी कार्यलयीन सहाय्यक श्रीराम चव्हाण उपस्थित होते.

(छाया : इसाक शेख)



**लाभार्थी यांच्या अर्जावर कार्यवाही करून लकी ड्रॉ मधून मंजूर लाभार्थी यांना लेखी कळवले नाही तर १६ जानेवारी २०२५ रोजी पंचायत समिती शेवगाव कार्यालयासमोर सावली दिव्यांग संघटना पदाधिकारी व दिव्यांग बांधव ठिय्या आंदोलन करतील.**

**चांद कादर शेख, अध्यक्ष**
**सावली दिव्यांग संघटना, शेवगाव**

## प्राचार्य हरिभाऊ दिघे यांचा हरित श्रीमंत प्राचार्य म्हणून सन्मान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर –** दुष्काळी पट्ट्यात विद्यार्थ्यांच्या मदतीने मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करुन हिरवाई फुलविणारे तळेगाव दिघे (ता. संगमनेर) येथील शिक्षण महर्षी गुलाबराव जोंधळे कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य हरिभाऊ दिघे यांना पीपल्स हेल्पलाइनच्या वतीने हरित श्रीमंत प्राचार्य म्हणून सन्मान करण्यात आला. तर शालेय परिसरात रेन गेन बॅटरी प्रकल्पाचे भूमीपूजन करण्यात आले.

सेवानिवृत्त शिक्षक रामनाथ आभाळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी पीपल्स हेल्पलाइनचे ॲड. कारभारी गवळी, उपप्राचार्य संजय दिघे, पर्यवेक्षक बी.सी. दिघे, बाबा जगताप, अविनाश बिराडे, संभाजी सुर्वे, भाऊसाहेब दिघे, ओंकार भागवत, ज्योत्स्ना उंडे, रामनाथ आभाळे आदींसह प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्राचार्य हरिभाऊ दिघे म्हणाले की, रेन गेन बॅटरी मोहीम म्हणजे निसर्गाच्या शहाणपणाशी भागीदारी आहे. रेनगेन बॅटरीमुळे जमिनीतील ओलावा वर्षभर टिकून राहणार आहे आणि त्यामुळे ग्लोबल वॉर्मिंगच्या लढ्याला नक्कीच यश येऊ शकेल. त्याच वेळेला सर्वत्र पाणी टंचाई भासत असताना त्यावर देखील मात करता येऊ शकणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लोभी माणसांमुळे सर्वत्र वृक्षतोड झाली, शेततळे आणि बोअरवेल्समुळे जमिनीतील ओलावा संपला आणि आपण आता वाळवंटाकडे वाटचाल करत आहोत. त्यातूनच ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न निर्माण झाला आहे. परंतु रेनगेन बॅटरीमुळे जमिनीच्या खाली आणि झाडांच्या मुळांना वर्षभर ओलावा निर्माण करता येणार आहे. त्यातून पुन्हा एकदा निसर्गराई सर्वत्र उभी होऊ शकणार असल्याचेही दिघे यांनी सांगितले.



रामनाथ आभाळे म्हणाले की, महाविद्यालयाच्या आवारात रेन गेन बॅटरी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. यामुळे विद्यार्थी व शिक्षकांमध्ये पर्यावरणाबाबतची मोठी आस्था निर्माण होणार आहे. त्यामुळे राज्यातील प्रत्येक शिक्षण संस्थेमध्ये एकापेक्षा अनेक रेन गेन बॅटरी बसविले जातील अशी अपेक्षा व्यक्त केली.

ॲड. कारभारी गवळी म्हणाले की, सन १९७२ नंतर संपूर्ण महाराष्ट्रात गेली ५२ वर्षे दुष्काळाने सर्व शेतकरी होरपळले आहे. सध्या सर्वत्र ग्लोबल वार्मिंगचा प्रश्न भेडसावत आहे. यावर एकच मार्ग तो म्हणजे, जमिनीखालच्या भागात सर्वत्र वर्षभर ओलावा टिकून ठेवायचा आणि त्यासाठी रेन गेन बॅटरी अतिशय उपयुक्त आहे. शेत जमिनीच्या उताराला आडवा २० फूट लांबीचा, ५ फूट रुंदीचा आणि ८ फूट खोलीच्या खड्ड्यांमध्ये दगड, गोटे टाकून वरच्या बाजूला मुरूम भरायचा आणि पावसाचे पाणी अशा बॅटरीमध्ये सोडून दिल्यामुळे तातडीने पावसाचे पाणी जमिनी खाली जाते आणि त्यातून वाहणार पाणी किंवा ऊन, वारा व प्रकाशामुळे बाष्पीभवन मोठ्या प्रमाणात थांबते.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, सहसंपादक– तुकाराम कामठे, कार्यकारी संपादक – जयश्री विजय सांगळे मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Co-editor- Tukaram Kamate, Executive Editor- Jayshri Vijay Sangale Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## निवडक

### विद्यार्थ्यांच्या अश्वारोहण ने उपस्थितीतांचे फेडले डोळ्याचे पारणे



अहिल्यानगर - सावेडीतील आठरे पाटील पब्लिक स्कूल मधील विद्यार्थ्यांनी वार्षिक दिन कार्यक्रमात उत्कृष्ट असे अश्वारोहण करून उपस्थितीयांचे डोळ्याचे पारणे फेडले,सर्व उपस्थित पाहण्यात मंत्रमुग्ध झाले होते,या मध्ये मुलांनी वेगवेगळ्या कसरती व अश्वारोहण करून दाखविले.
डॉ.अनिल आठरे यावेळी म्हणाले युद्धमध्ये अश्वदलाचे मोठे योगदान असून आजही आपण घोड्यांचा वापर सैन्यात करतो.२६ जानेवारीच्या परेडमध्ये राष्ट्रपतींना एस्कॉर्ट घोडेस्वार असतो. आमच्या शालेत अश्वारोहण प्रशिक्षण शाळाअसून त्याचा ही फायदा विद्यार्थी घेतात,सर्व पालकांनी आपल्या मुलांना दुपारी २ ते ५ या वेळेत शाळेमध्ये अश्वारोहण सह विविध खेळ खेळण्यासाठी पाठवावे राष्ट्रीय स्तरावर अनेक स्पर्धा असतात.या प्रशिक्षणामुळे मुले त्यात सहभागी होऊ शकतील.

### परिट समाजाच्या सामायिक क्षेत्रातील अवैध बांधकाम थांबवा



अहिल्यानगर- परिट समाजाच्या सामायिक क्षेत्रात सुरु असलेले बांधकाम त्वरीत थांबविण्याच्या मागणीसाठी श्रीगोंदा येथील ज्येष्ठ नागरिक बाळू काळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालया समोर उपोषण केले. या उपोषणात वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे, निलेश काळे, संदीप शिंदे, जिल्हा महासचिव प्रसाद भिवसने आदी सहभागी झाले होते. भूमापन क्रमांक १७७० मधील परिट समाजाच्या सामायिक क्षेत्रावर एका कुटुंबीयांनी बांधकाम सुरु केलेले आहे. त्या जागेवर बांधकाम करणाऱ्यांनी घरकुल योजना मंजूर करून घेतली आहे. या प्रकरणात श्रीगोंदा नगर परिषदेचे मुख्य अधिकारी मनमानी कारभार करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. काळे यांनी २ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सदरच्या अवैध बांधकामा संदर्भात लेखी तक्रार दिली होती. या संदर्भात बांधकाम थांबवण्याचे आदेश देण्यात आले. मात्र विद्यमान दिवाणी न्यायाधीश श्रीगोंदा न्यायालयात गैरअर्जदार यांनी तक्रारदार यांच्याविरुद्ध मनाई हुकूमाचा दावा दाखल केला होता. न्यायालयाने सदरचा दिवाणी न्याय निवडा ३ एप्रिल २०१८ रोजी आदेश पारित केला. या आदेशानुसार एकूण क्षेत्र पैकी ६४०.९ मधील २३४.८३ क्षेत्र मध्ये गैरअर्जदार यांचे पक्के बांधकाम, उर्वरित ४०६.७ मध्ये अर्जदार व इतर यांना कपडे धुणे, वाळू घालवणे तसेच इतर वापर करण्याचा अधिकार न्यायालयाने दिला. सदरचे वादग्रस्त क्षेत्रफळ भूमापन क्रमांक १७७० चे प्रकरण न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ आहेत. समोरील गैरअर्जदार न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करता श्रीगोंदा नगरपालिकेचे अधिकारी यांच्याशी आर्थिक तडतोड करून उपरोक्त क्षेत्र ४०६.७ मध्ये अवैध बांधकाम सुरु असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

# सामाजिक कार्याला अध्यात्मिक सेवेचे पाठबळ- सचिन महाराज पवार

## बारा बलुतेदार महासंघाची संत सेना महाराज मंदिरांना देणगी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** समाजात होत असलेला विकास जर स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या आधुनिक मूल्यांना धरून होत नसेल तर या मूल्यापासून वंचित असलेल्या समूह एका समान पातळीवर नेतृत्व, विचारप्रणाली कार्यकर्तेया सर्वांचे नियोजन करून एकत्र येतो त्या प्रमाणे अहिल्यानगर बारा बलुतेदार महासंघाची वाटचाल सुरू आहे समाजातील प्रश्नांबरोबरच सामाजिक कार्याला महत्त्व देत आता अध्यात्मिक क्षेत्रात देखील चांगले काम करीत आहे. त्यामुळे सामाजिक कार्याला अध्यात्मिक सेवेचे पाठबळ मिळते ही बाब महत्त्वाची आहे. असे प्रतिपादन सचिन महाराज पवार यांनी केले.

अहिल्यानगर येथे बारा बलुतेदार महासंघा तर्फे नव वर्षाचे स्वागत संत सेना महाराजांच्या दोन मंदिराच्या बांधकामाला दहा हजार रुपयांची देणगी देऊन करण्यात आले. नेवासा व आष्टी तालुक्यातील धानोरा येथे सुरू असलेल्या मंदिराला प्रत्येकी ५ हजार रू.ची देणगी दिली. हभप सुनील महाराज पवार हभप परमेश्वर गायकवाड महाराज यांच्याकडे जिल्हाध्यक्ष माऊली गायकवाड यांनी मदत सुपूर्त केली.

यावेळी बारा बलुतेदार महासंघाचे जिल्हाध्यक्ष व नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष माउली गायकवाड, व्हीजेएनटी शहर जिल्हाअध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, नाभिक मंडळाचे जिल्हाध्यक्ष इंजिनीयर बाळासाहेब भुजबळ, माजी नगरसेवक निखिल वारे, सुनिल त्रंबके, बाळासाहेब पवार, सुनील भिंगारे अनिल निकम, पारनेरचे मनोहर राऊत, गणेश खंडागळे, डॉ.सुदर्शन गोरे, बाळासाहेब इवळे, लवेश गोंधळे, जामखेडचे शिवकुमार डोंगरे, नितीन राऊत, राहुरीचे दत्ता दुधाडे, जना वाघ, अनिल इवळे, मच्छिंद्र बनकर, बबन कुसळकर, संजय पुंड, सुधीर पुंड, चंद्रकांत पुंड,रमेश सानप, बापु इंगळे, विष्णु पाबळे, सुधाकर पवार, योगेश पिंपळे, शैलेश धोपटे, अशोक औटी, रमेश बिडवे, डॉ. रणजीत सत्रे, बाळू वखरे, भाऊसाहेब कोल्हे, संतोष जाधव, रवी वारे, सुरेश चुटके, मल्हारी गीते, संदीप घुले, सुरेश आंबेकर, शिवाजी मदने, सौ.रोहिणी बनकर, छायाताई नवले, सुधाकर कानडे, जयदीप ऋषी, कविटकर मामा आदिसह कार्यकर्तेमोठ्या संख्येने उपस्थित होते.

हभप परमेश्वर महाराज गायकवाड यांनी देखील या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. मनोगत व्यक्त करताना माऊली गायकवाड म्हणाले दरवर्षी नवीन वर्षाला वेगवेगळे उपक्रम बारा बलुतेदार महासंघाच्या वतीने मी राबवित असतो सर्वांचे सहकार्य मिळत असल्याने या माध्यमातून जनसेवा हा एकच उद्देश असल्याने सर्व उपक्रम यशस्वी होतात याचे समाधान वाटते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संभाजी गवळी यांनी केले. तर बापू गायकवाड यांनी आभार मानले.



नगर मधील सावेडीतील श्री अय्यप्पा मंदिर हे दाक्षिणात्य पद्धतीचे अत्यंत आकर्षक असून यामध्ये अय्यप्पा स्वामी,गणपती व सरस्वतीची स्वतंत्र मंदिरे आहे आहे सध्या चालू असलेल्या मंडल महापूजा आणि मकर विल्लकु महोत्सवामध्ये मूर्तींची आकर्षक अशी फुलांची सजावट करण्यात येते,मंदिराच्या मूर्तींच्या गाभाऱ्यात लाईट नाही त्यामुळे तेलाच्या दिव्याच्या प्रकाशात मूर्ती प्रसन्न दिसतात.

# स्वस्तिक चौकात शौर्य दिनानिमित्त अभिवादन

## शंकर पंडित मित्र मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे वाटप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–**येथील पुणे रोड वरील स्वस्तिक चौकातील पुणे बस स्थानकाच्या बाहेर शौर्य दिन अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.आमदार संग्राम जगताप यांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तींचे पूजन करण्यात आले व शंकर पंडित मित्र मंडळाच्या वतीने यावेळी पाणी बॉटल व महाप्रसादाचा वाटप करण्यात आले.

यावेळी मयूर बांगरे, बालीशेठ, संपत बारस्कर, दिनेश जोशी, शंकर पंडित, सुभाष वाघमारे, भागवत भाऊ, सुनील जुनी,अम्मु शेख, मुकुंद सोनवणे, आजाद शिंदे, महेश सूर्यवंशी,सतनाम संग जुनी,भोला पंडित, रोहित पंडित, सोनू जुनी,बंटी भिंगारदिवे, श्याम पाचरणे, युवराज पाचारणे आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी आमदार जगताप म्हणाले शौर्य दिनाच्या निमित्ताने जे भाविक कोरेगाव भीमाला जातात व येतात त्यांच्यासाठी शंकर पंडित मित्रमंडळाने महाप्रसाद व बिसलरी पाणी बॉटल वाटपाचा स्तुत्य उपक्रम घेतला आहे व व त्याचा लाभ हजारो भाविकांना भाविकांनी घेतला मंडळाचे हे कार्य खरंच कौतुकास्पद आहे. पुणेरोड कडे सर्व जाणाऱ्या व येणाऱ्या प्रवाशांना तसेच सर्वांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते महाप्रसाद व पाणी बॉटल देण्यात आली.

# भुतकरवाडी येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी दंतरोग शिबिर

## श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्य कौतुकास्पद – डॉ सुदर्शन गोरे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** ज्येष्ठ नागरिकांनी विशेषतः वाढत्या वयात कृत्रिम दंत रोपण करून आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी.की दात आहे तर चने नाही,आणि चणे आहे तर दात नाही.अशी परिस्थिती होता कामा नये. म्हणून ज्येष्ठ नागरिकांनी कृत्रिम दंत रोपण करून आपले आरोग्याची काळजी घ्यावी.जेष्ठ नागरिक संघाच्या वतीने भुतकरवाडी येथे वर्षेभर विविध आरोग्य शिबिरे भरविले जातात.यामुळे आरोग्याचे विशेष काळजी घेतली जाते. श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्य कौतुकास्पद आहे.असे प्रतिपादन दंतरोग तज्ञ डॉ सुदर्शन गोरे यांनी केले.

भुतकरवाडी येथील श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघ व गोरे डेंटल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने नववर्षानिमित्त परिसरातील नागरिकांसाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष भीमाशंकर लांडे,सचिव अंबादास बेंद्रे,खजिनदार विश्वनाथ जाधव,सदस्य सावरकर मनीराम ,रमेश मुसळे,दिनकर देशमुख, सुनील काळे,चंपाताई जगताप,सुनंदा सत्रे,छगनराव भुतकर,रमेश डाके,रत्नमाला लांडे,रघुनाथ कोतकर, शंकरराव पडोळे,मच्छिंद्र भुतकर,जनार्दन चव्हाण, विश्वनाथ आदी उपस्थित होते.

याप्रसंगी भीमाशंकर लांडे म्हणाले,ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने दरवर्षी विविध उपक्रम साजरे केले जातात. सर्वांचे जीवन सुंदर सुखी व आरोग्यदायी व्हावे यासाठी जेष्ठ नागरिक संघाचे सर्व कार्यकर्ते परिश्रम घेत असतात.दंत रोग तपासणी शिबिरास नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला आहे. दिनकर देशमुख यांनी आभार मानले.व शिबीर यशस्वी करण्यासाठी अंबादास बेद्रे यांनी परिश्रम घेतले.

## नवीन वर्षाचे प्रारंभ सार्वजनिक स्वच्छतेच्या संदेशाने

# हरदिन मॉर्निंग ग्रुपने राबविले चांदबीबी महाल परिसरात स्वच्छता अभियान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** आरोग्य व पर्यावरण संवर्धनाची चळवळ चालविणाऱ्या हरदिन मॉर्निंग ग्रुपने नवीन वर्षाचे प्रारंभ सार्वजनिक स्वच्छतेचा संदेश देऊन करण्यात आला. शहरा जवळ असलेल्या ऐतिहासिक चांदबीबी महाल परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. परिसरात लावण्यात आलेल्या झाडांना पाणी देऊन वृक्ष संवर्धनाचाही संदेश यावेळी देण्यात आला. तर विविध क्षेत्रात यश प्राप्त करणाऱ्या ग्रुपच्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

भिंगार शहरातील धम्ममित्र दीपक अमृत यांना कर्नाटक राज्यात आदर्श बौद्ध कार्यातील डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल, सोलापूर येथील सोनार समाजाच्या वतीने रत्नकुमार मेहेत्रे यांना उद्योग रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल व मानव अधिकार संरक्षण समितीच्या (नवी दिल्ली) जिल्हा नियोजन कमिटी सदस्यपदी जैद सय्यद यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा ग्रुपच्या वतीने सत्कार करण्यात आला.

स्वच्छता अभियानात संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, ॲड. अतुल गुगळे, अशोकराव दळवी, राजू शेख, रमेशराव वराडे, मेजर दिलीप ठोकळ, जहीर सय्यद, सर्वेश सपकाळ, दीपकराव धाडगे, मनोहर दरवडे, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, जालिंदर बेल्हेकर, दिलीप गुगळे, सुधीर तावरे, गणेश बुऱ्हा, राहुल भिंगारकर, प्रा. सलाबत खान, अभिजीत सपकाळ, सुधीर कपाळे, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, अविनाश जाधव, अशोकराव पराते, विकास भिंगारदिवे, सरदारसिंग परदेशी, अशोकराव लोंढे, मुन्ना वाघस्कर, रामनाथ गर्जे, अरुण तनपुरे, शिरीषराव पोटे, दीपक मेहतानी, प्रकाश देवळालीकर, राजू कांबळे, सूर्यकांत कटोरे, अविनाश पोतदार, बबन चिंचिणे, जालिंदर अळकुटे, नवनाथ वेताळ, नामदेवराव जावळे, सिताराम परदेशी, शेषराव पालवे, भीमराव फुंदे, सखाराम अळकुटे, योगेश चौधरी, नितीन भिंगारकर, प्रशांत भिंगारदिवे, सुनील कसबे, भरत कनोजिया, सुभाष गोंधळे, दिलीप बोंदर्डे आदी ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संजय सपकाळ म्हणाले की, हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या माध्यमातून आरोग्य व पर्यावरण संवर्धनाची चळवळ चालवली जात आहे. प्रत्येकाचे जीवन आरोग्यमयी होण्यासाठी योग-प्राणायामाच्या माध्यमातून तर पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षरोपणाद्वारे हरदिन मॉर्निंग ग्रुप योगदान देत आहे. आरोग्यासाठी सार्वजनिक स्वच्छता महत्त्वाची असून, ग्रुपच्या माध्यमातून वर्षभर स्वच्छतेचे उपक्रम घेण्यात येतात. नागरिकांमध्ये सार्वजनिक स्वच्छतेची जागृती निर्माण झाल्यास रोगराईला आळा बसणार असल्याचे स्पष्ट केले. तर ग्रुपच्या वतीने लावण्यात आलेल्या झाडांचे संवर्धनाचेही काम सुरु असल्याची माहिती त्यांनी दिली. ग्रुपच्या सदस्यांनी चांदबीबी महाल परिसरात पसरलेला प्लास्टिक पिशव्या, प्लास्टिक बॉटल व इतर मोठ्या प्रमाणात कचरा जमा करुन परिसराची स्वच्छता करण्यात आली.

# गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानतर्फे कर्करोग जनजागृती मोहिम

## कर्करोगाचा शून्यावस्थेत शोध घेण्याचा विशेष उपक्रम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानतर्फे नवीन वर्षात कर्करोग जनजागृतीसाठी आणि त्याचा शून्यावस्थेत (स्टेज ०) शोध घेण्यासाठी विशेष उपक्रम सुरू केला जात आहे. नागरिकांना कर्करोगाबाबत योग्य माहिती देणे, त्याचा अगदी सुरुवातीच्या टप्प्यावर शोध घेणे, त्यावरील उपाययोजना करणे आणि मानसिक आधार प्रदान करणे, या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याची माहिती देण्यात आली आहे.

या उपक्रमात संस्थेच्या वतीने दर ३ महिन्याला कर्करोग निदान शिबिर घेणे, त्याच प्रमाणे रुग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांना मार्गदर्शन करुन विविध शंका दूर केल्या जाणार आहेत. या मोहिमेत सायकलॉजिस्ट, डॉक्टर आणि कॅन्सर सारख्या रोगातून बरे झालेले रुग्ण या टीम मध्ये कार्यरत राहणार आहेत. यामध्ये कॅन्सर तज्ञ डॉ. सतीश सोनावणे, ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. अमित बडवे, मानसोपचारतज्ञ व कर्करोग विजेती अश्विनी गोलांडे, मॅक्सो-फेशियल सर्जन डॉ. संजय असनानी, स्त्रीरोग व आयुर्वेदिक तज्ञ डॉ. सिमरनकौर वाधवा, दंतचिकित्सक डॉ. मानसी असनानी, पत्रकार सुदाम देशमुख, मीडिया मॅनेजमेंट हरमनकौर वधवा आदींसह या उपक्रमात शहरातील नामांकित डॉक्टर व तज्ञांचा समावेश आहे.

या विशेष उपक्रमासाठी गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानचे हरजीतसिंग वधवा, जनक आहुजा, प्रितपालसिंग धुप्पड, प्रशांत मुनोत, राजेंद्र कंत्रोड, सतीश गंभीर, गुलशन कंत्रोड, मुनाशेठ जग्गी, सनी वधवा, सुनील थोरात, राजू जग्गी, सोमनाथ चिंतामणी, कैलाश नवलानी, राजा नरंग, सुनील छाजेड, विपुल शाह, दलजीतसिंग वधवा, राहुल बजाज, कैलाश नवलानी, दमोधर माखिजा, करण धुप्पड, किशोर मुनोत, राजेश कुकरेजा, मनू कुकरेजा, सिमर वधवा, प्रमोद पंतम, शरद बेरड, सुनील मेहतानी, दीपक मेहतानी, संदेश रपारिया, गोविंद खुराणा, अमरजितसिंग वधवा, करण धुप्पड, कबीर धुप्पड, कैलास ललवाणी आदी कार्यरत आहेत.

**कर्करोगाचे लवकर निदान का महत्त्वाचे आहे?**

कर्करोग हा प्रामुख्याने सुरुवातीच्या टप्प्यात ओळखला गेला, तर त्यावर उपचार सोपे आणि अधिक प्रभावी ठरतात. अनेकदा कर्करोगाची लक्षणे सूक्ष्म स्वरूपात असतात, ज्यामुळे ती दुर्लक्षित केली जातात. म्हणूनच प्रतिष्ठानतर्फे जनतेला साध्या लक्षणांकडेही लक्ष देण्याचे आवाहन करण्यात येत आहे. कोणतीही असामान्य गाठ किंवा सूज, सतत होणारी वेदना किंवा अस्वस्थता, त्वचेवर दिसणारे बदल किंवा नवीन डाग, अनपेक्षित वजन कमी होणे, यापैकी कोणत्याही लक्षणांचा अनुभव येत असेल, तर त्वरित वैद्यकीय तपासणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तर प्रतिष्ठानच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**कॅन्सरवर शून्यावस्थेत मात करणे कसे शक्य आहे?**

कॅन्सरला शून्यावस्थेत शोधून काढणे म्हणजे त्याचा उपचार लवकरात लवकर सुरू करणे. यामुळे गंभीर अवस्थेत जाण्याची शक्यता कमी होते आणि महागड्या उपचारांची गरज भासत नाही. अगदी साध्या चाचण्या आणि नियमित तपासण्यांमुळे हे शक्य आहे.

**नवीन उपक्रम आणि शिबिरे–**

या उपक्रमात प्रतिष्ठानतर्फे दर तीन महिन्यांनी कर्करोग निदान शिबिरे आयोजित केली जातील. या शिबिरांमध्ये लोकांना कर्करोगासंबंधित चाचण्या आणि त्यासंबंधी मार्गदर्शन दिले जाणार आहे. याशिवाय, कर्करोगातून बरे झालेल्या व्यक्तींशी संवाद साधून प्रेरणा घेण्याची संधी उपलब्ध करण्यात येणार आहे.

## अहमदनगर पहिली मंडळी सी.एन.आय.चर्च ख्रिस्तजन्मोत्सव आयोजित कार्यक्रम अंतर्गत धार्मिक नाटीका व समुह नृत्य सादरीकरण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** अहमदनगर पहिली मंडळी, सी. एन. आय. चर्च हातमपुरा लहान लेकरांचे म्हणजेच संडे स्कूलच्या विद्यार्थ्यांचे कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमामध्ये महिला मंडळ आणि तरुण संघ यांनी सुध्दा सहभाग घेतला. बायबलमधील व्यक्तीरेखेवर आधारीत लहान लेकरांनी वेषभुषा आणि ख्रिस्तजन्मोत्सव नाटीका, धार्मीक गाण्यावर समूहनृत्य आणि वैयक्तिक नृत्य सादर केले, चर्चच्या सभासदांनी हया लहान लेकरांना प्रोत्साहन दिले त्यांना वैयक्तिक बक्षीस देउन त्यांच्या कलेचा सन्मान आणि कौतुक केले.

त्याचप्रमाणे महिला मंडळ यांनी नाताळ साजरा करीत असतांना प्रभु येशुला आपल्याकडून काय अपेक्षित आहे? याचे महत्व नाटीकेद्वारे पटवून दिले. तरुण संघाने समुहनृत्य आणि संगीत नाटीका सादर केली. संगित नाटीकेमधून आजचा तरुण व्यसनाधीन आणि मोबाईल वेडा झालेला असल्यामुळे परमेश्वराच्या आशिर्वादापासून कसा दुर गेला आहे? आणि जर जगातील या सर्व मोहपाशापासून स्वतःला दुर ठेवले आणि परमेश्वराची आराधना केली तर परमेश्वर आशिर्वादांची वृष्टी करतो. असे या नाटीकेद्वारे तरुण संघाने समाजप्रबोधन केले. या कार्यक्रमामध्ये लहान लेकरांपासून वयोवृध्द सभासदांनी सहभाग नोंदविला आणि विविध कला या प्रसंगी सभासदांनी सादर केली.

हे सर्व कार्यक्रम यशस्वी पार पाडण्याकरीता चर्चचे धर्मगुरु रेव्ह अभिजीत तुपसुंदरे, सचिव श्री सतिश मिसाळ, उपसचिव श्री प्रितम जाधव, खजिनदार डॉ. संजय लाड, उपखजिनदारख्री सॅम्युएल बोर्डे, कार्यक्रम समिती अध्यक्ष श्री प्रसन्ना शिंदे, प्रा. विनीत गायकवाड, श्री रविंद्र लोंढे श्री सुनित ढगे, श्री अमोल लोंढे, कुमार हर्षल पाटोळे, सौ. शोभना गायकवाड, सौ. वंदना शिंदे, सौ. कांदबरी सुर्यवंशी, सौ. शशिकला साळुंके, श्रीमती स्नेहल साळवे हया कमिटी सदस्यांनी परिश्रम घेतले तसेच कौतुकास्पद परिश्रम चर्चचा तरुण संघाने घेतले. महिला मंडळ, चर्च सभासद हयांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# ऐतिहासिक मार्कंडेय मंदिरास शासनाचा तीर्थक्षेत्र देवस्थानाचा दर्जा व निधी मिळवून देऊ - आ. संग्राम जगताप

## भक्तिपूर्ण वातावरणात गांधी मैदान येथील मार्कंडेय मंदिराच्या जीर्णोद्धार कामाचा शुभारंभ




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नव्या वर्षाची सुरवात मंदिराच्या कामाने करण्याचा पद्मशाली समाजचा उपक्रम कौतुकास्पद आहे. मोठे ऐतिहासिक महत्व असलेल्या अहिल्यानगर शहरातील भगवान मार्कंडेय महामुनींचे मंदिर हिंदू भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या मंदिराचा जीर्णोद्धाराचा निर्णयही स्वागतार्ह आहे. यासाठी कितीही खर्च येऊ द्या. मी तुमच्या पाठीशी आहे. या ऐतिहासिक देवस्थानला शासनाचा तीर्थक्षेत्र देवस्थानाचा दर्जा मिळवून देण्यासाठी निश्चीत प्रयत्न करू. तसेच जिल्हा नियोजन मंडळाकडूनही देवस्थानाला निधी उपलब्ध करून देऊ, असे आश्वासन आ.संग्राम जगताप यांनी देऊन मंदिराच्या जीर्णोद्धार कामास जगताप कुटुंबाचाही हातभार लागेल, अशी ग्वाही आ.जगताप यांनी दिली.

अहिल्यानगर मधील १०० वर्षांहून अधिक जुन्या व ऐतिहासिक असेलल्या पद्मशाली समाजाचे आराध्यदैवत श्री मार्कंडेय महानुनिंच्या गांधी मैदन येथील मंदिराच्या जीर्णोद्धार कामाचा शुभारंभ नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी अहिल्यानगरचे आ.संग्राम जगताप यांच्या हस्ते व शहर भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष महेंद्र गंधे प्रमुख उपस्थितीत भक्तिपूर्ण वातावरणात झाले. यावेळी उपस्थित शेकडो नागरिकांनी मार्कंडेय महामुनींचा व छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार केला. यावेळी श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्रीकांत छिंदम, उपाध्यक्ष मनोज दुलम, पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्दम (सर), माजी उपमहापौर श्रीपाद छिंदम, माजी नगरसेवक संजय चोपडा, उपाध्यक्ष बालराज सामल, सचिव प्रकाश कोटा आदींसह श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्टचे व पद्मशाली पंचकमिटी विश्वस्त ट्रस्टचे पदाधिकारी, मोठ्या संख्यने पद्मशाली समजतील नागरिक व महिला उपस्थित होते.

महेंद्र गंधे म्हणाले, अहिल्यानगर मधील मोठे ऐतिहासिक हे देवस्थान आहे. या मंदिराच्या उभारणीस पूर्ण सहकार्य करूच. शिवाय देशात व राज्यात भाजपची सत्ता आहे. या दोन्ही सरकारांच्या सहकार्याने व आ.जगतापांच्या सहकार्याने मंदिराच्या उभारणीसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देऊ.

प्रास्ताविकात मार्कंडेय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्रीकांत छिंदम म्हणाले, मार्कंडेय महामुनींच्या मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या निमित्ताने शहरातील सर्व पद्मशाली समाज एकवटला आहे. या मंदिराच्या कामास आजपासून प्रत्यक्षात सुरवात होणार असून एक वर्षात पूर्ण करण्याचा निर्धार आम्ही केला आहे. यासाठी आ.जगताप व महेंद्र गंधे यांनी शासनाकडून निधी उपलब्ध करून द्यावा.

यावेळी बाळकृष्ण सिद्दम यांनी मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाने ठराव करून रीतसर परवानगी दिली आहे. संस्थेच्या शाळांच्या उभारणी नव्या जागेत करण्याचा निर्णय असून इमारतीच्या उभारणीसाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले. भीमराज कोडम यांनी पद्मशाली समाजाच्या वतीने भूमिका विषद करून छिंदम बंधूंनी मंदिर उभारणीसाठी घेतलेल्या पुढाकारामुळेच अनेक वर्षांपासून रखडलेले मंदिर जीर्णोद्धाराच्या कामास प्रत्यक्षात सुरवात होत आहे, असे सांगितले.

माजी उपमहापौर श्रीपाद छिंदम यांनी गेल्या एक वर्षात मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी घेतले गेलेल्या निर्णयांची सविस्तर माहिती देत सांगितले, पद्मशाली समाजातील वाद समन्वयाने मिटवले असून शाळा व देवस्थाने समन्वयाने एकामातेने जीर्णोद्धाराचा निर्णय घेतला आहे. मंदिरातील जुन्या मुर्त्या शास्त्रोक्त पूजा करून काढल्या असून आता नव्या मुर्त्यांची प्राणप्रतिष्ठा येथे होणार आहे. मंदिराच्या जीर्णोद्धार कामास सर्व नागरिकांनी व दानशुरांनी हातभार लावावा, असे आव्हान केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ट्रस्टचे सचिव प्रकाश कोटा यांनी केले, आभार सुरेखा कोडम यांनी मानले. यावेळी श्री मार्कण्डेय मंदिर देवस्थान ट्रस्टचे खजिनदार अजय म्याना, पद्मशाली पंचकमिटी विश्वस्त ट्रस्टचे अध्यक्ष अशोक सब्बन, सरचिटणीस विनायक मच्चा, खजिनदार शंकर येमूल, संजय वल्लाकट्टी, शंकर सामलेटी, विनायक गुडेवार, राजू म्याना, सुमीत इप्पलपेल्ली, गणेश बुरा, संजय चीप्पा, पुरुषोत्तम बुरा, सुरेखा विद्ये, रत्ना बल्लाळ, सविता कोटा, स्नेहा छिंदम, उमा बडगु, भारती न्यालपेल्ली, अनिता कोंडा, सारिका सिद्धम, स्मिता म्याना, ज्ञानेश्वर मंगलारप, बालाजी गोणे, रोहन येनगंदुल, महेंद्र यंगुल, हरी येलदंडी, विनोद म्याना, दीपक गुंडू, सुनील कोडम, अमोल बोल्ली, कुणाल दुडगू, कृणाल बुरगुल, राहुल गुंडू, देवीदास गुडा आदींसह पद्मशाली ज्ञाती समाज मंडळाचे सदस्य व पद्मशाली समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# स्पर्धांमुळे युवकांना स्वत:च्या क्षमता ओळखता येतात – न्यायाधीश भाग्यश्री पाटील

## । राष्ट्रीय युवा सप्ताहानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन । युवक–युवतींना सहभागी होण्याचे आवाहन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** स्पर्धांमुळे युवकांना स्वत:च्या क्षमता ओळखता येतात. तर आकलन शक्तीला चालना मिळते. प्रत्येक तरुणांमध्ये जन्मजात ऊर्जा, सामर्थ्य क्षमता असते. त्याची ओळख युवकांना विविध स्पर्धेतून होत असते. युवकांना प्रोत्साहन दिल्यास भारताला जागतिक महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही, असे प्रतिपादन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव तथा न्यायाधीश भाग्यश्री पाटील यांनी केले.

जय युवा अकॅडमी, जिल्हा क्रीडा कार्यालय, नेहरू युवा केंद्राच्या वतीने ९ ते १२ जानेवारी दरम्यान सावेडीतील कोहिनूर मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय युवा सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत न्यायाधीश पाटील बोलत होत्या. यावेळी जय युवाचे अध्यक्ष ॲड. महेश शिंदे, विशेष जिल्हा सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, नोटरी पब्लिक भारत सरकारचे ॲड. सुमतीलाल बलदोटा, माहेरच्या अध्यक्षा रजनी ताठे, गायत्री गुंड, ॲड. विद्या शिंदे आदी उपस्थित होते.

न्यायाधीश पाटील म्हणाल्या की, युवाशक्ती ही सर्व क्षेत्रांमध्ये निर्णायक घटक आहे. युवकांनी कायद्याची देखील माहिती घेणे आवश्यक आहे. विविध स्पर्धेमध्ये सहभाग घेतल्याने युवकांमध्ये स्पर्धात्मक गुण विकसित होणार आहेत. स्वामी विवेकानंद यांना प्रेरणास्त्रोत ठेवून युवकांनी पुढाकार घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

ॲड. सुरेश लगड यांनी ११ जानेवारी रोजी निबंध वक्तृत्व, हस्ताक्षर, चित्रकला, लोकगीतावर आधारित समूह नृत्य, वैयक्तिक नृत्य, लोककला, पथनाट्य, मेहंदी, ब्युटी टॅलेंट शो अशा विविध स्पर्धा घेण्यात येणार असून, युवकांनी मोठ्या संख्येने राष्ट्रीय युवा सप्ताहात सहभागी होण्याचे आवाहन केले.

या स्पर्धेत सहभागी प्रत्येक स्पर्धकाला प्रशस्तीपत्र तसेच विजेत्यांना आकर्षक स्मृती चिन्ह देण्यात येणार आहे. स्पर्धेचे परीक्षण नृत्य विशारद अनंत द्रविड, गीतकार सुनील महाजन, ॲड. अनिता दिघे, डॉ. अमोल बागुल, विद्या सोनवणे, अनिल साळवे, कावेरी कैदके, सागर अलचेट्टी, पोपटराव बनकर, दिनेश शिंदे करणार आहेत. या सप्ताहासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी आमसिद्ध सोलनकर, ज्ञानेश्वर खुरांगे, विशाल गर्जे, प्रवीण कोंढावळे, भाऊराव वीर, नेहरु युवा केंद्राचे जिल्हा समन्वय अधिकारी संकल्प शुक्ला प्रयत्नशील असल्याची माहिती स्वागताध्यक्ष किशोर डागवाले व सुहासराव सोनवणे यांनी दिली.

# डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल धम्ममित्र दिपक अमृत यांचा गौरव

## तथागत बुध्दिस्ट सोसायटीने शहरात केला सन्मान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बौध्द धम्म चळवळीतील धम्ममित्र दिपक अमृत यांना बौध्द धम्माच्या कार्याबद्दल डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल त्यांचा तथागत बुध्दिस्ट सोसायटी इंडियाच्या वतीने गौरव करण्यात आला. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे झालेल्या गौरव सोहळ्यात संस्थेचे अध्यक्ष संजय कांबळे यांनी अमृत यांचा सत्कार केला. याप्रसंगी संस्थेचे भन्ते सचितबोधी, धम्ममपाल, धम्मशिरी, शिवाजी भोसले, रमेश पगारे, वधु–वर सुचक प्रमुख अशोक बागुल, बौध्दाचार्य विजितकुमार ठोंबे, बौध्दाचार्य दिपक पाटोळे, पप्पु देठे, जाधव, दिव्याताई, सिंध्दात काळे, सुमेध डंबाळे, प्रशांत शिंदे आदी उपस्थित होते.

संजय कांबळे म्हणाले की, जिल्ह्यातील बौध्द धम्म चळवळीत दिपक अमृत सातत्याने योगदान देत आहे. त्यांच्या निस्वार्थ कार्याची दखल घेऊन कर्नाटक येथील युनिव्हर्सिटी ऑफ टोलोसाच्या वतीने त्यांना डॉक्टरेट पदवी बहाल करण्यात आलेली आहे. त्यांचा झालेला हा सन्मान जिल्ह्यातील बौध्द धम्म चळवळीच्या दृष्टीने अभिमानास्पद आहे. सरकारी नोकरीत कार्यरत राहून ते तथागत बुध्दिस्ट सोसायटीला जोडले गेले असून, उपाध्यक्ष पदाची जबाबदारी ते सांभाळत आहे. संस्थेच्या माध्यमातून सुरु असलेल्या गरीब कुटुंबातील दांपत्याचा विवाह लावणे, मोफत आरोग्य शिबिर, बौद्ध वधू वर सूचक मंडळ, बौद्धाचार्य तयार होण्यासाठी श्रामनेर शिबिर राबविणे या कार्यात त्यांचा सातत्याने सहभाग असतो. त्यांचा झालेला सन्मान हा सर्वांसाठी भूषणावह असल्याचे त्यांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना दिपक अमृत म्हणाले की, धम्म चळवळीशी जोडलो गेल्याने समाजात सन्मान मिळाला. बौध्द धम्माच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांची सेवा करण्याची संधी मिळत आहे. हा सन्मान एकट्याचा नसून, चळवळीतील सर्व सहकाऱ्यांचा असल्याचे त्यांनी सांगितले.

# तंत्रज्ञानाच्या युद्धात वाचन संस्कृती सरस- डॉ. अमोल बागुल

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत जिल्हा वाचनालयात दुर्मिळ विश्वकोशाचे प्रदर्शनाचे उद्घाटन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** प्रत्येकाच्या हाती आलेला मोबाईल व त्यामधून होणार्या तंत्रज्ञानाच्या भडीमारातून मानवी मने आत्मकेंद्रित होत आहेत. मानवी संवेदना, कल्पनाशक्ती वृद्धिंगत करण्यासाठी वाचनाशिवाय पर्याय नसून वाचनालय व त्यातील ग्रंथ संपदा तंत्रज्ञानाच्या या युद्धात वाचन संस्कृती तारत असल्याचे प्रतिपादन राष्ट्रपती पुरस्कार विजेते कृतिशील शिक्षक डॉक्टर अमोल बागुल यांनी व्यक्त केले.

उच्च तंत्र शिक्षण विभाग आणि ग्रंथालय संचालनालय ग्रंथालय संचालनालय यांच्या वतीने आयोजित वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमा अंतर्गत अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने दुर्मिळ ग्रंथ प्रदर्शन उद्घाटन प्रसंगी डॉ. बागुल उद्घाटक म्हणून बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक नंदकिशोर आढाव, वाचनालयाचे उपाध्यक्ष दिलीप पांढरे, संचालिका शिल्पा रसाळ, किरण अगरवाल, ग्रंथपाल अमोल इथापे ,नितीन भारताल पल्लवी कुक्कडवाल ,वाचक अनिल झवर,श्री राजहंस, सुडके उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. बागुल यांनी वाचन संस्कृतीची द्विशतकी परंपरा असणारे नगर वाचनालय हे आपणा सर्वांच्या दृष्टीने अभिमानास्पद आहे.माहिती तंत्रज्ञानाच्या युगात उगवत्या पिढीने वाचते होणे ही काळाची गरज आहे. वाचनालयात असंख्य दुर्मिळ पुस्तकांचा खजिना आहे. युवा पिढीने तो वाचून रीता केला तर त्यांचे आयुष्य खर्या अर्थाने भरून जाईल. वाचनालयाने आयोजित केलेले हे प्रदर्शन त्या दृष्टीने प्रेरक असल्याचे डॉक्टर बागुल म्हणाले.

उद्योजक नंदकिशोर आढाव यांनी यावेळी बोलताना अहिल्यानगर वाचनालयाच्या कर्मचारी व संचालक मंडळ यांच्या संयुक्त प्रयत्नातून चालवलेला हा वाचन संस्कृतीचा वारसा देशासाठी व समजासाठी लोकाभिमुख आहे.वाचनालयाची ज्ञान संपदा युवा वर्ग व बाल वाचकापर्यंत घेऊन जाण्याची व त्यांनीही ती आत्मसात करण्याची गरज आहे. परदेशात ग्रंथालय, पुस्तके व वाचक यांना अनन्यसाधारण महत्त्व व प्रोत्साहन दिले जाते. शासनाने सुरू केलेली वाचन संकल्पनाची ही चळवळ प्रेरणादायी असल्याचे ते म्हणाले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते दुर्मिळ ग्रंथ विश्वकोश यांच्या पुस्तकाचे उद्घाटन वाचनालयाच्या सभागृहात करण्यात आले.मान्यवरांचा सन्मान ग्रंथपाल अमोल इथापे व नितीन भारताल यांनी केला. प्रास्ताविक व सूत्रसंचालन संचालिका शिल्पा रसाळ यांनी केले आभार कुमारी पल्लवी कुक्कडवाल यांनी मांडले.

अतिशय दर्जेदार व दुर्मिळ असणारे हे प्रदर्शन वाचनालयाच्या हॉलमध्ये १५ जानेवारी पर्यंत वाचनालयाच्या कार्यालयीन वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले आहे. महाविद्यालयीन युवक युवती , शाळेतील शाळेतील विद्यार्थी ,प्राध्यापक ,शिक्षक आनिरसिक वाचक यांना भेट द्यावी असे आवाहन वाचनालयात संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. याप्रसंगी संजय गाडेकर,संकेत फटक,पल्लवी कुक्कडवाल, वर्षा जोशी,निखिल ढाकणे यांचे सहकार्य लाभले.

(पान १ वरून)

## आयुक्त साहेब हेच का फ्लेक्समुक्त शहराचं धोरण? - किरण काळे

**पुतळ्याचे काम तात्काळ पूर्ण करा :**

किरण काळे यांनी म्हटले आहे की, छत्रपती संभाजी महाराजांच स्मारकाचआणि पुतळ्याचे काम पूर्ण होण्यापूर्वीच या ठिकाणी फ्लेक्सचा बाजार भरला आहे. मनपाने ही जागा तात्काळ फ्लेक्समुक्त करत रखडलेले काम तात्काळ पूर्ण करावे.

**नाट्यगृहा बाबत आश्वासने नको कृती हवी :**

फ्लेक्सबाजीच्या छायाचित्रात मागे मनपाच्या प्रलंबित नाट्यगृहाचा भगनावस्थेतील सांगाडा दिसत आहे. काँग्रेसने यापूर्वी देखील पोलखोल करत या ठिकाणी तळीरामांच्या भरलेल्या अड्याचं ओंगळवाण चित्र मनपा समोर मांडलं होतं. मात्र अनेक दिवस उलटूनही हे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही. कालच या जागेची पाहणी शहराच्या लोकप्रतिनिधींनी करत लवकरच हे काम पूर्ण होईल असे म्हटले होते. यावर निशाणा साधताना किरण काळे म्हणाले की, काम लवकर होईल असं आजवर लोकप्रतिनिधी मागील सुमारे सात ते आठ वर्षांपासून सांगत आहेत. आश्वासन नको कृती करा. नाट्य, साहित्य, संगीत कलाकार आणि रसिकांची मागणी पूर्ण करा. अन्यथा तीव्र आंदोलन छेडू, असा जाहीर इशारा किरण काळे यांनी दिला आहे.

## ब्राह्मणीत दूध डेअरीचे सतरा लाख लुटणाऱ्या टोळीतील तिघेजण जेरबंद

माहिती कारमधील आरोपींना दिली. कारमधील व मोटारसायकलवरील आरोपींनी फिर्यादीची कार अडवून काचा फोडून रोख रक्कम असलेली बॅग घेऊन गेले असल्याचे सांगितले. पथकाने गोपनीय माहितीनुसार आरोपी सचिन राजेंद्र वायदंडे (वय – २४ वर्षे, रा. गेट नं. ०६, सम्राटनगर, नागापूर, एमआयडीसी ता. जि. अहिल्यानगर. मुळ रा. अचानक नगर रोड, खंडाळा, ता. श्रीरामपुर जि. अहिल्यानगर), शुभम मनोज गुळसकर (वय २४ वर्षे, रा. बोल्हेगाव, एमआयडीसी ता. जि. अहिल्यानगर), अभिषेक लक्ष्मण जाधव (वय २४ वर्षे, रा. नवनागापूर, गजानन कॉलनी, ता. जि. अहिल्यानगर) यांना बोल्हेगांव, एमआयडीसी परिसरातून जेरबंद केले. चौकशीत गुन्ह्यातील ३ लाख रुपये, १ लाख रुपये किमतीची मोटारसायकल, १२०० रुपये किमतीचे गुन्ह्यात वापरलेले हत्यार असा एकूण ४ लाख १ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीपैकी शुभम मनोज गुळसकर हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी नारायणगांव पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल आहे. ताब्यातील आरोपी व विधीसंघर्षीत बालक यांना तपासकामी राहुरी पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

## पीओपी गणेश मूर्ती वरील बंदी कायमस्वरूपी रद्द करून न्याय मिळवून द्यावा

कोर्टाच्या तशा आदेशा अनुसार त्या कारणे प्रदूषण महामंडळ व प्रशासन व्यवस्थेसह शासनास काही नियम व नियमावली घालून दिलेले आहेत त्या अमलात आणण्यासाठी प्रशासन व्यवस्थेकडून कृत्रिम जलतलाव तयार करून अशा मुर्त्या विसर्जित करण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. परंतु प्रदूषण महामंडळ व प्रशासन व्यवस्था याकडे दुर्लक्ष करत त्यांची जबाबदारी मूर्तिकार व निर्माते कारखानदारांवर जाणीवपूर्वक लादून ते या जबाबदारी पासून त्यांचे काम चालढकल करत आहेत. न्यायालयाच्या निर्णयाचा चुकीचा अर्थ लावत विनाकारण मूर्तिकारांना मुर्त्या बनविण्यापासून रोखून त्यांना बेरोजगार करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तर दुसऱ्या बाजूने हिंदू धर्मातील देवी देवतांवर व सण उत्सवावर प्रदूषणाच्या नावाखाली अघोषित बंदी आणण्याचा प्रयत्न करून देशात अराजकता माजविण्याचा प्रयत्न केंद्रीय प्रदूषण महामंडळ व त्या अनुषंगाने नगरपालिका, नगरपरिषदा, महानगरपालिका यांच्याकडून होत असल्याचे चित्र महाराष्ट्रभर दिसून येत आहे. असे निवेदनात म्हटले आहे.जिल्हाध्यक्ष भरत निंबाळकर म्हणाले की महाराष्ट्रात असे प्रदूषण करणारे अनेक असंख्य इलर उत्पादनांचे कारखाने महाराष्ट्रात सुरू आहेत की या कारखान्यातून वाहणारे पाणी व केमिकल सर्रास नदी नाल्यांमध्ये सोडले जाते. या केमिकल मुळे जलचर प्राणी व मनुष्यास जीवित हानी होत आहे. याबाबत प्रदूषण महामंडळाकडून कधीच शिस्तबद्ध नियमानुसार आणि धोरणात्मक कारवाई झाल्याचे निदर्शनास येत नाही. त्या कारखान्यांना अभय दिला जातो त्यातून आर्थिक तडजोडी मोठ्या प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास येते परंतु गणपती उत्सव नवरात्र उत्सव है सार्वजनिक उत्सव असल्याकारणाने आणि यातून कुठलेही मोठा व्यवसाय कोणा एका व्यक्तीचा नसल्याकारणाने, छोटे छोटे कौटुंबिक व पारंपारिक व्यवसाय करणारे कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर असल्याकारणाने यातून प्रदूषण महामंडळाच्या अधिकाऱ्यांना कुठलाही लाभ होत नसल्याकारणाने व महानगरपालिकेला या विसर्जनाबाबतच्या खर्चास महानगरपालिकेला अतिरिक्त खर्च वाटत असल्या कारणाने ही प्रशासन व्यवस्था भारतातील सर्वसामान्यांच्या धार्मिक भावनांना वेठीस धरून देवी देवतांच्या मुर्त्या बंद करण्याचा प्रयत्न किंवा कारवाईच्या नावाखाली कर्तबदारी दाखवण्याचा प्रयत्न या अधिकारी व कर्मचारी वर्गाकडून होत असल्याचे निदर्शनास येत आहे. हिंदू देवी देवतांच्या मुर्त्यांचे विसर्जन वर्षातून एक दिवस होते. त्यातून कधीही प्रदूषन व जिवीतहानी झालेली नाही. त्याला टार्गेट करून वर्षानुवर्ष सुरू असलेले प्रदूषण युक्त पाणी, रसायन नदीमध्ये वाहतात याकडे नागरिकांचे लक्ष जाणार नाही. त्यासाठीचे प्रदूषण महामंडळाचे प्रयत्न असल्याचे यातून निदर्शनास येत आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व त्याच्या जाचक आर्टीमुळे पी.ओ.पी मूर्तीवर बंदी आल्यास आम्ही आमच्या कुटुंबासह रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची वेळ येऊ शकते म्हणून आम्हाला बेरोजगार करण्याचा प्रयत्न त्वरित थांबवावा व महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात धार्मिक सण उत्सव आणि त्यातील मूर्तीचे आकर्षण कमी होणार नाही याची दखल शासनासह प्रदूषण महामंडळाने घेतली पाहिजे असे निंबाळकर यांनी सांगितले.

यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी मूर्तिकारांचा प्रश्न विधानसभेत मांडून तो सोडवण्याचे सांगत मनपाआयुक्तांशी चर्चा करून शहरातील गणेश मूर्तिकारांना न्याय मिळवून देऊ असे सांगितले.

## नाट्य कलाकारांचे हक्काचे व्यासपीठ लवकरच नगरकरांच्या सेवेत सुरु होणार – आ. संग्राम जगताप

पूर्ण होऊन या ठिकाणी युवा नाट्य कलाकारांना आपली कला सादर करता येईल असे नाट्य कलाकार श्रेणिक शिंगवी यांनी सांगितले.

नाट्य संकुलनाचे काम मार्गी तातडीने मार्गी लागावे यासाठी उपाययोजना करत कामाला गती दिली, येत्या तीन महिन्यांमध्ये सिविल वर्कचे काम पूर्ण होईल आणि नाट्य कलाकारांना बरोबर घेऊन लाईट सिस्टीम, साऊंड सिस्टिम, बैठक व्यवस्था, चेंजिंग रूम, व्हीआयपी रूम याबाबत चर्चा करून पुढील कामालाही सुरुवात केली जाणार असल्याची माहिती आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.

## मनू भाकेर, डी गुकेशसह चार खेळाडूंना खेलरत्न

राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. दरम्यान, हे पुरस्कार जाहीर होण्यापूर्वी केंद्र सरकारकडून क्रीडा क्षेत्रातील सर्वोत्तम कामगिरीसाठी देण्यात येणाऱ्या ध्यानचंद खेलरत्न पुरस्कारच्या यादीत नेमबाज मनू भाकेरचे नाव नसल्याने मोठा वाद झाला होता. पण, आज जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांमध्ये मनू भाकेरला मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार देण्यात आला आहे.